# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/04/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## दुखापत

**१) पो.स्टे. बेला** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील विटाभट्टी कळमना फाटा जवळ बेला येथे दिनांक २२/०४/२०२३ चे १९/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– महाविर सहदेवजी वाडवे, वय ३० वर्ष रा. कवडापुर ता. उमरेड जि. नागपुर ह. मु रोहीदास काकडे रा. ढवळपेठ यांच्या शेतात व त्याची पत्नी हे **आरोपी नामे– रोहीदास काकडे रा. ढवळपेठ जि नागपुर** यांच्या शेतात सालदार म्हणुन काम करत असुन तसेच दुसरी महीला नामे –नुतन मेश्राम ही सुध्दा आरोपीच्या शेतात काम करत होती फिर्यादी याने नुतन मेश्राम यास सांगितले कि तु आरोपी यांच्या शेता मध्ये जास्त काम करत असल्याने माझ्या पत्नीला सुध्दा जास्त काम करावे लागत आहे त्यामुळे आरोपी याने फिर्यादीस विटभट्टीजवळ बोलावुन तु नुतन यास जास्त काम का करते असे का म्हणाला यावरून फिर्यादीस आरोपी याने डाव्या हाताला डाव्या पायाला व कमरेला काडीने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भा.द.वी. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशि जाकिर शेख ब. नं. ३८० मो. नं. ९६३७०७०७०० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत केसलापुर मौदा येथे दिनांक १९/०४/२०२३ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश सुरेश सिंग रा. केसलापुर, मौदा यांच्या शेजारी राहणारे **आरोपी क्र. १) प्यारेलाल गायकवाड** हा राहत असुन आरोपी क्र. **२) हर्ष गायकवाड** व **३) निरज शाहु सर्व रा. केसलापुर मौदा** हे आरोपी क्र. १ च्या घरी किरायाने राहतात तिन्ही आरोपी हे फिर्यादीच्या घरासमोर विनाकारण शिवीगाळ करू लागले व फिर्यादीने त्याना हटकले असता आरोपी क्र. १ याने म्हटले की तु माझा किरायदार यांना का शिवीगाळी करतो असे म्हणुन फिर्यादी सोबत हातबुक्क्याने मारपीट केली त्यामध्ये फिर्यादीच्या उजव्या हाताचा मधला बोट फॅक्चर झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ३४ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. चौधरी मो. नं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर